**अनुज्ञापन खातेः**

सार्वजनिक सुरक्षितता व समाजहित जपण्याच्या दृष्टीने अनुज्ञापन खाते पुढील कामे पार पाडतेः-

**(1) विविध व्यवसाय व सामुग्रीचे साठे बाळगण्यास परवाने देणेः**

परिशिष्ट “एम” मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 394 च्या अंतर्गत येणारे अनुज्ञेय व्यवसाय व साठे यांच्यावर अनुज्ञापन खात्याचे नियंत्रण असते.

मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 479 अन्वये महानगरपालिकेच्या अटी व शर्ती सापेक्ष व्यवसाय व साठ्यांना अनुज्ञापत्रे मंजूर केली जातात. अनधिकृतपणे व्यवसाय व साठे करणा-या व्यक्तींविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 471 अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येते. त्याचप्रमाणे अनधिकृत व्यवसाय व साठे हे नागरिकांच्या जीविताला मालमत्तेला धोकादायक असल्यास अग्निशमन दलाचे अभिप्राय घेऊन मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 394 अन्वये जप्तीची कारवाई करण्यात येते. तसेच अनधिकृत ज्वालाग्राही, विषारी व धोकादायक रसायनांच्या उत्पादनावर व साठ्यांवरही कायदेशीर कारवाई करण्यात येते. प्रसंगी मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 516 अअ अन्वये अशा उत्पादन व साठयांविरुघ्द पोलिसांच्या मदतीने पंचनामा करुन संबंधीत व्यक्तीस अटक करण्याची व साठा जप्तीची कारवाई पोलासांच्या मदतीने करण्यात येते.

मुंबई महानगरपालिकेने निरनिराळया कलमांतर्गत मंजूर करण्यात येणा-या नवीन अनुज्ञापत्रांना परवानगी देणे व अनुज्ञापत्रांचे नूतनीकरण सुलभ रितीने होण्यासाठी हयाबाबतचे धोरण शिथिल करुन दि.15 ऑगस्ट, 2001 पासून विभाग कार्यालयांमध्ये अनुज्ञापन खात्याच्या नियंत्रणाखाली एक खिडकी योजना सुरु करण्यात आली होती. त्या अनुषंगाने ह्या योजनेअंतर्गत सरकार / निमसरकारमान्य 1 जानेवारी, 1995 पूर्वीचे पुरावे सादर केले असतील अशाच जागांवर व बांधकामामध्ये अग्निशमन दल व इतर संबंधित खात्यांच्या अभिप्रायाच्या पूर्ततेसापेक्ष अनुज्ञापत्रे मंजूर केली जात असत. मात्र दिनांक 1 एप्रिल, 2007 पासून महानगरपालिकेत संगणकीय सॅपप्रणाली अस्तित्वात आल्याने अशाप्रकारची अनुज्ञापत्रे देण्यासाठी आता संगणक प्रणालीत छाननी यादी देण्यात आली आहे. सदर छाननी यादीत विहित करण्यात आलेल्या कागदपत्रांची अर्जदाराने पूर्तता केल्यावर नवीन अनुज्ञापत्र अर्जदारास वितरीत करण्यात येतात. तसेच देण्यात आलेल्या अनुज्ञापत्रांचे वार्षिक तत्वावर नूतनीकरण करण्यात येते.

**(2) दुकानांच्या अवकानांवर (प्रोजेक्शन्सवर) नियंत्रण ठेवणेः**

मुंबई महानगरपालिका अधिनियम,1888 च्या कलम 313(1)(ब)(क) अन्वये मुंबई महानगरपालिकेच्या पदपथ व रस्ते ह्यावरील दुकानांच्या अवकानांवर, दुकानफळी, दर्शक कपाटावर

अनुज्ञापन खाते नियंत्रण ठेवते. ह्या संदर्भात दुकान मालकाने दुकानाच्या जागेचे व त्याच्या मालकी हक्काचे कागदोपत्री पुरावे सादर केल्यास त्याला त्याच्या दुकानालगतच्या जागेवर दुकानफळी, दर्शक कपाटे, छप्पर, सरक ढापणी, दरवाजे इत्यादींना परवानगी देण्यात येते. तसेच त्यांचे मासिक / वार्षिक तत्वावर नूतनीकरण करण्यात येते.

**(3) बैठया व फिरत्या अनधिकृत विक्रेत्यांवर नियंत्रण ठेवणेः**

मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 313 अ / 313ब अन्वये फेरीवाल्यांना रस्ते / पदपथावर अनुज्ञापत्रे 1977 पर्यंत देण्यात येत होती. माननीय सर्वोच्च न्यायालयाचे दि.30 जुलै, 2004 रोजीचे आदेश प्राप्त होईपर्यंत गटई कामाचे बैठे परवाने तसेच अंध / अपंग व्यक्तींना देण्यात येणा-या सार्वजनिक दूरध्वनी केंद्रांना अनुज्ञापत्रे देण्यात येत होती. तथापि, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे दि.30 जुलै, 2004 च्या आदेशान्वये कोणत्याही व्यवसायासाठी नवीन अनुज्ञापत्र देण्यास मनाई करण्यात आली आहे म्हणून त्यानंतर अद्याप कोणालाही अनुज्ञापत्र देण्यात आलेले नाही.

**(4) जाहिरातीः**

बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने मुंबई शहराचे सौंदर्यीकरण वाढविण्याच्या दृष्टीने महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 328/328 अ अन्वये आकाशचिन्ह व जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी परवानगी देण्याबाबतची धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे 2000 मध्ये सुधारणा करुन सुधारित मार्गदर्शक तत्त्वे दिनांक 10 जानेवारी, 2008 रोजी प्रसृत करण्यात आली आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या श्रेणीपर्यंत बाह्य जाहिरातींच्या क्षेत्राचा दर्जा सुधारणे हा त्यामागचा उद्देश आहे. मुंबई शहराचे सौंदर्य वाढविण्याच्या दृष्टीकोनातून जाहिरात फलकांचे आकारमान, संरचना व दोन जाहिरात फलकातील अंतर याबाबतच्या विशिष्ट अटी / नियम अंतर्भूत करण्यात आले आहेत.

जनतेची सुरक्षितता लक्षात घेऊन एकावर एक जाहिरात फलक लावण्यास तसेच त्यांचे एकत्रिकरण करण्यास व जाहिरात फलक महानगरपालिकेच्या पदपथावर / रस्त्यांवर अथवा इमारतींच्या बाहेर प्रक्षेपित करण्यास बंधन घालण्यात आले आहे. मुंबई शहरात जाहिरात फलकांच्या संख्येत भूछत्राप्रमाणे वाढ झाल्यामुळे तसेच गच्चीवरील / छतावरील जाहिरात फलकांमुळे इमारतींचे होणारे नुकसान लक्षात घेऊन यापूढे गच्चीवर / छतावर नवीन जाहिरात फलकास परवानगी देण्यात येणार नाही. तसेच 2 जाहिरात फलकांमधील कमीत कमी अंतर 20 मीटर ऐवजी 100 मीटर पर्यंत करण्यात आले आहे. यापुढे धार्मिक जागा, पुरातत्व हद्दितील क्षेत्र याठिकाणी नवीन जाहिरात फलकांना परवानगी देण्यात येणार नाही. स्मशानभूमी, दफनभूमी याठिकाणी परवानगी देतांना ती मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे लगतच्या आवाराच्या भिंतीवर व रस्त्यांच्या समांतर असे देण्यात येईल. जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासन किंवा महानगरपालिका परवाना प्राप्त बांधकाम अभियंत्यांनी दिलेल्या संरचनात्मक स्थैर्यता प्रमाणपत्राची छाननी झाल्याशिवाय कुठलाही नवीन जाहिरात फलकास

परवानगी दिली जाणार नाही किंवा त्यांचे नूतनीकरण होणार नाही. शहराचे सौंदर्य वाढविण्याच्या दृष्टीकोनातून जाहिरात फलकाचे आकारमान प्रत्येक परिमंडळानुसार ठरविण्यात आले आहे.

राजकीय तसेच कोणत्याही पक्षाकारांकडून वाढदिवसाचे अभिष्टचिंतन, पदाधिका-यांचे नियुक्तीचे अभिनंदन, धार्मिक सणानिमित्त शुभेच्छा इत्यादी जाहिरात प्रदर्शित करण्यास पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दित पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

तसेच बृहन्मुंबई शहरातील अनधिकृतपणे प्रदर्शित केलेल्या बॅनर्स, बोर्डस, फलक, इ.यांच्यावर अनुज्ञापन खात्यातील अतिक्रमण निर्मुलन विभागातील जाहिरात निरीक्षकांच्या मदतीने निष्कासनाची कारवाई त्वरित करण्यात येते.

सही/-

**अनुज्ञापन अधीक्षक**